Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# महाभारतातील निवडक व्यक्तिरेखा : एक अभ्यास

**डॉ. रजनी बुजाडे,**
महिला महाविद्यालय,
नंदनवन, नागपूर.
Email: rajanibawankar1@gmail.com

---

महाभारत हे प्राचीन इतिहास सांगणारे महाकाव्य. भारतीय तत्वज्ञानामध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरूषार्थांना महत्व आहे. यांनाच व्यासांनी महाभारतात अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, मोक्षशास्त्र यांची जोड देऊन सुंदर कथांनी मनोरंजक व सुशोभित करून मांडले. आर्यजातीचे विस्तृत ज्ञान आणि विशाल लोकजीवन यांचा सुस्पष्ट साक्षात्कार महाभारतून घडतो. म्हणूनच महाभारताताला "पंचमवेद" अशी वेदांची उंची मिळाली. हिमालयातून भागीरथी नदी उगम पावते. तिच्या तीरावर विशालभद्री हे तीर्थक्षेत्र आहे.या तीर्थक्षेत्रात व्यासांनी आपला आश्रम स्थापन केला.

निरनिराळ्य लोकांनी निरनिराळ्य शब्दात महाभारताचे महात्म्य वर्णन केले आहे. महाभारत खऱ्याखुऱ्या अर्थाने प्राचीन भारत वर्षाचा विश्वकोष आहे.जगाच्या साहित्यात एवढेमोठे महाकाव्य दुसरे कोणतेही नाही. ग्रीकांचे 'इलियड व ओडेसी' ही महाकाव्ये महाभारताच्या तुलनेत खुजी आहेत. महाभारत हा असा एक ग्रंथ आहे की हजारो वर्ष होऊन गेले तरीही कथाकार, किर्तनकार ग्रंथकार, कवी, नाटककार समीक्षक हे सर्व यातील पात्रे, त्यांचे स्वरूप, स्वभाव, वैशिष्ट्ये ,ग्रंथातील सुभाषिते यातून नवा नवा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करीत आहे.

त्याच व्यासांच्या दिव्यप्रतिभा विश्वात दैदिप्यमान सुर्यासारखा तपणारा विश्वकोष जणू असा हा जयनामक इतिहास किंवा महाभारत हा ग्रंथ आहे. महाभारत हे मोठे महाकाव्य आहे.मानवी मनाच्या सर्वच पैलुंचे त्यात दर्शन दिसते.तो एक प्रचंड कल्पवृक्ष असे म्हणण्यात येते.

**महाभारतातील निवडक व्यक्तिरेखा कृष्ण**

महाभारतातील या काही निवडक व्यक्तिरेखा आहे. कृष्ण हा जगाचा नियंता आणि अलौकिक असे व्यक्तिमत्व असलेला पुरूष ! महाभारतात कृष्ण हा कौरव – पांडवांच्या संघर्षात पाहायला मिळतो. त्याचे पहिले दर्शन द्रौपदी – स्वयंवर प्रसंगी गुप्तवेशात घडते. वस्त्रहरणाच्या वेळी द्रोपदीला मदत करणे, पांडवांसाठी जरासंध वध ,राजसुर्य यज्ञ व शेवटी कौरवाशी युद्धात सारथ्य अशी त्याची रूपे! तों एक केंद्रबिंदू आहे असे दुर्गाबाई भागवत यांनी म्हटले आहे.कृष्ण भीष्म, कर्ण, अर्जुन, द्रौपदी, कुंती, युधिष्ठीर ही पात्रे उभी राहतात. त्यापैकी पहिली व्यक्ती म्हणजे कृष्ण होय.

महाभारतातील राजमंडळात कृष्ण सर्वाधिक महत्वाचा आहे. म्हणून तो अग्रपुजेच्या लायक आहे.

राजसुर्य यज्ञाच्या नंतर जेव्हा शिशुपाल वध घडला त्यात कृष्णाने आपलया आतेभावाचे नव्व्यानव अपराध पोटात घातले. परंतु जेव्हा रूक्मिणीविषयी बोलू लागला तेव्हा मात्र तो सहन करू शकला नाही. स्त्रीयांच्या बाबतीत आदरभाव असणारी महाभारतातील एक व्यक्ती म्हणजे कृष्ण होय. आचार्य दादा धर्माधिकारी कृष्णाला स्त्रीदाक्षिण्याचा मूर्तिमंत पुतळा मानीत.

अतिशय खोड्य करून रंगविलेला कृष्ण गुराख्याचे काम करतांना गोपबालकात खेळ खेळणारा कृष्ण, वृंदावनात गायी चरतांना ,वत्सलतेने जपणारा ,गोकुळातील वृद्ध तरूण गोपींना मनमोहन वाटणारा कृष्ण, अशी अनेक आकर्षक रूपे भाष्यकारांनी मांडले आहे.

आजचे युग कृष्णाचे वेगवेगळ्य परीने स्वागत करतात.संताना आवडणारा ,कविंना भुलविणारा,विचारवंतापूढे आदर्श ठेवणारा, गोरगरिबांना वात्सल्याने न्हावून काढणारा ,प्राचीन राजकारणात सुगंधाची जपणुक करणारा असा समर्थ कृष्ण आहे. त्याची आठवण निरनिराळ्य रूपात कायम आहे. अशाप्रकारे कृष्णावरील मराठी भाष्यकारांची भाष्ये प्रस्तुत प्रबंधात विचारात घेतली आहे.

**भीष्म :**

भीष्माबद्दल 'अंग गलित पलितम मुडंम दशनविहीन जात तुडंम ' हे शंकराचार्यांनी केलेले वृद्धावस्थेचे वर्णन आठवते.'जीवेत शरद: शतम' हा त्याच आयुष्याचा महामंत्र आहे.

वृद्धाबद्दल योग्य तो आदर तरूणांनी बाळगावा व वृद्धांनी त्यांना न डगमगता सल्ला द्यवा अशीच त्या काळातील समाजाची मनोरचना दिसते.द्रौपदीवस्त्रहरणच्या वेळेस सारी सभा पाहत होती. खुद्द भीष्म ही डोळे उघडे ठेवून पाहत राहिले. द्रौपदीवर होणारा अन्याय हा गांधारीनेच दूर केला . कारण स्त्रीचे दु:ख स्त्रीच दूर करू शकते याचा प्रत्यय महाभरतात दिसतो. भीष्माला या संदर्भात कमीपणा येते.

महाभारतातील स्त्रीया जितक्या वडिलकीचा आदर करतात तितके पुरूष मात्र वार्धक्याकडे वळूनही आपली वडिलकी सांभाळतांना दिसत नाही. कुरूक्षेत्राला आदरणीय व सर्वमान्य पुरूष व वृद्ध म्हणजे ' पितामह भीष्म' होय.सैन्यात भेद नको म्हणून भांडणही त्यांनीच मिटवले.

आयुष्यभर दुर्योधनाची बाजू घेऊन आपण लढलो. पण कुरू राज्याला योग्य तो राजा दुर्योधन नव्हे असे त्यांना वाटत होते. दुर्योधनाच्या उपरोक्त वचनाने त्यांना हादरा बसला. जीवनमूल्यांचा मृत्यू पत्करण्यापेक्षा आपण स्वेच्छेने यातून निवृत्त व्हावे असे भीष्मानी ठरवले असे दिसते.

**कर्ण :**

गेल्या चार पाच दशकातील सुर्यपुत्र, कौतेय, मृत्यूंजय, राधेय या ललित कृतीतही कर्ण रंगविलेला आहे. नियतीने ठरविल्याप्रमाने कुमारी अवस्थेत झाल्यामूळे कुंती कर्णाला नदीत सोडुन देते. राधा व अधिरथ यांनी त्याचे पालन पोषन केले आहे. म्हणून कर्णाला सुतपुत्र म्हणून ओळखल्या जाते.

महाभारतातील कर्णाचे चरित्र हे अलिकडच्या काळात विद्वानांच्या चिंतनाचा विषय झाला.

कर्णच्या मोठेपणची दोन अंगे स्पष्ट होतात.ती म्हणजे कृतज्ञता आणि कर्तव्यबुद्धी .

दुर्योधनाची मैत्री हे कर्णाच्या जीवनातील एक महत्वाचे पर्व आहे. कर्णनेच दु:शासनला द्रौपदी ला विवस्त्र कर अशी आज्ञा दिली होती .अर्जुनाने कधीही त्याचा मत्सर केला नाही. परंतु या प्रसंगानंतर मात्र कर्ण सुद्धा दुर्योधनाइतकाच पांडवांना वैरी वाटू लागला.

महाभारतात कर्ण हा दानशूरत्वाबद्दल प्रख्यात होता .इंद्राने कवच कुंडलाचे दान मागितले.ते त्याने दिले. संपूर्ण महाभारतात कर्णने अर्जूनाचा मत्सर केलेला दिसतो. कर्णच्या गर्विष्ठ आणि भंडखोर स्वभावामुळे तो पुष्कळदा एकाकी पडला. दुर्योधनाची मैत्री करून तो एकाकी पडला हे म्हणणे बरेचसे पटण्यासारखे आहे. भारतीय युद्ध ही कर्णाला मिळालेली सर्वात माठी देणगी आहे असेही विशिष्टार्थाने म्हणता येईल.

**दुर्योधन**

महाभारत हे केवळ महाकाव्य नसून पौराणिक इतिहास मानला जातो. त्यातील दुर्योधनाची व्यक्तिरेखा काही घटनाची आधारभूत ठरते. खलनायक मात्र सर्वाच्या मते दुर्योधनच आहे . या खलनायकाचे मानसशास्त्रीय विश्लेषन करतांना दुर्गाबाई भागवत म्हणतात ,"दोन वृद्ध ,अपंग मने आणि बालमने म्हणजेच दुर्योधन".

भाष्यकारांनी दुर्योधनाची तुलना माडाच्या झाडाशी केली. जसे झाडाच्या पायाला कुठलाच रंग आणि आकार नसतो.पाण्याची जवळीक हाच त्याचा आधार असतो. पांडवांना धुताच्या खेळातून पराभूत करून वनवासात पाठवल्यानंतर जे राज्य दुर्योधनाने हस्तगत केले तेही नंतर देण्यास नकार दिला.''सुईच्या अग्रावर मावेल एवढी ही भूमी मी परत देणर नाही '' असे त्याचे शब्द होते. यातूनच कौरव पांडव यूद्ध झाले. दुर्योधन हा पांडवाचा वैरी होता. पुर्ववृत्तांत समजविण्यासाठी व्यासांनी महाभारतात ठिकठिकाणी, निरनिराळ्य प्रसंगातून दुर्योधनाच्या छटा दाखविल्या आहेत.

व्यासांनी दुर्योधनाचा स्वभाव सांगतांना त्याला ठिकठिकाणी मूर्ख व बालिश असे म्हटले आहे. त्याने द्रौपदीवस्त्रहरणाचा खेळ मांडला.त्यामुळे महाभारताच्या विशाल पटलावर द्रौपदी व दुर्योधन ही दोन्हीही पात्रे वेगवेगळ्य अर्थाने महत्वाची आहे.प्रत्यक्ष धृतराष्ट्राला ही दुर्योधनाने धोक्यात ठेवले.पांडवांचा मामा शल्य यालाही त्याने आपल्याकडे वळविले. युद्धाच्या दिवशी आपला पराजय झाला हे कळताच तो रणांगणातून पळाला.

दुर्योधन महाभारतात वर्णिल्याप्रमाणे दुष्ट पुरूष असला तरी खऱ्या अर्थाने संस्कृतच्या काव्यपरंपरेप्रमाणे तो खलनायक आहे. यूद्धात कर्ण शल्यप्राणस मुकले असतांना दुर्योधन एकाकी राहिल्यामूळे पांडवांनी त्याला शोधून काढले. तेव्हा हे राज्य मी तुम्हाला देतो अस त्याने सांगून पाहिले.पण युद्ध जिंकलेल्या पांडवांना दयेची भीक मान्य नव्हती.त्यामुळे तु लढण्यास तयार हो. त्याशिवाय हे युद्ध संपणार नाही. पा युद्धाचा आरंभ तूच केला व शेवट ही तूच करायला हवा. असे सांगून दुर्योधनाला प्रवृत्त केले.

**अर्जुन**

पाच पांडव म्हणजे युधिष्ठीर, भीम, अर्जुन, नकूल, सहदेव यात श्रेष्ठ असा पांडव अर्जुन. पृथेचा मुलगा म्हणून त्याचा उल्लेख पार्थ म्हणून केल्या जातो. कुंतीचा तिसरा पूत्र म्हणून उल्लेख आहे.

उत्तम शिष्य ,अजोड धनूर्धारी अभिमन्यूचा पिता दुर्दैवाने रूप दिलेला बृहन्नटा इत्यादी अर्जुनाची अनेक रूपे आहेत.ज्याप्रमाणे त्याचे बाण सरळ जातात त्याचप्रमाणे त्याचा स्वभाव सरळ आहे. परंतु त्याला अधुनमधुन नैराश्याचे झटके येतात. कृष्ण सखा त्याला नेहमीच साहृ करणारा व सदैव त्याच्या पाठीशी उभा राहणारा की त्यामुळे त्याला कोणत्याही कामात अपयश नाही. तो नर असून कृष्ण नारायण आहे.

महेंद्रचा पुत्र देवराज असेही त्याला म्हणतात. देवराज हा सर्व देवात श्रेष्ठ असल्यामुळे अर्जुन हा सुद्धा श्रेष्ठ गणल्या जातो. द्रोणासारखा गुरू मिळाल्यामुळे त्याला धनुर्विद्य चांगलीच अवगत झाली. त्यामुळे अर्जुन हा त्यांचा प्रिय शिष्य होता. सखा अर्जुन द्रोपदी चे विशेष आाकर्षण आहे. अर्जुनाबद्दल दुर्गाबाई म्हणतात, "अर्जुन हा धनुर्धर व धनुर्धराचे अस्तित्व युद्धावर अवलंबून असते. अर्जुन हा परीकथेचा आदर्श नायक आहे. त्यामुळे तो युधिष्ठीराच्या जवळ व बळाच्या भूमिकेत भीमाच्या जवळ आहे". कृष्णाचा प्राण अर्जुन आणि अर्जुनाचा प्राण कृष्ण या वचनाला धरून दोघानाही एकच विदारक नियतीला जखडून व्यासांनी मानवतेची मूल्ये कलेच्या परमोच्च पातळीवर कायमची नेऊन ठेवली.

**द्रौपदी**

'शरदुत्पभ पत्राक्षी' आणि 'शरदुत्पभ पुष्पपुज्य', समगंधा अशी स्त्री म्हणुन युधिष्ठीराने द्रौपदीचे वर्णन केले.

व्यासपर्वात दुर्गाबाईंनी द्रोपदी अशा स्त्री म्हणून तिचे वर्णन केले आहे. जिच्यामुळे पाहण्याऱ्या स्पर्धा व भांडण होण्याचा संभव असतो.व्यासांनी तिचे जागोजागी वर्णन केले आहे. श्यामवर्णी असे लक्षण ठिकठिकाणी दाखवले आहे. तिच्या सौंदर्यामुळे महाभारतातल्या विविध घटणांना चालना मिळाली. तिच्या रूपाचा प्रभाव सांगताना महाभारतात दोन उदाहरणे दिली आहेत.

१ . सुदेष्णा म्हणते की,तुला मी माझ्या घरी कशी ठेवू? तुझया रूपाला पाहून स्त्री सुद्धा मोहित होईल तिथे पुरूषांची काय कथा?

२. द्रौपदी स्नान करतांना ज्या स्त्रीयांनी तिचे सौंदर्य पाहिले त्या स्त्रीया म्हणतात की ,आम्ही पुरूष असतो तर किती बरे झाले असते असे त्यांना वाटते.पाच पतीच्या अनुरक्तीचा विषय झालेली आणि पाच पुत्रांना जन्म देऊन १३ वर्षे उलटली आहे.अशा वेळीही पुरूषांना कामासक्त करू शकते.यावरून तिचे देह लावण्य ,कमनीय कांती किंवा तिचे रूपविभ्रम याही वयात सोडून गेले नाही हे उघड आहे.

द्रौपदी पाचाची पत्नी आहे असा उल्लेख महाभारतात आहे. जिने पती दे असा पाच वेळा उच्चार केला म्हणून देवाने तिला पंचपतित्वाचा खडतर शाप दिला असे खुद्द महाभारतात वर्णन केले आहे. एकदंर पाहता व्यास आपल्या मनावरून तिच्या पार्थिव सौंदर्याची मोहिनी पुसून टाकतात. द्रौपदीला सम्रज्ञी करतात. पार्थिव संपूर्णतेचे पूर्णपुरूष कृष्ण तर संपूर्ण स्त्री द्रौपदी ही आहे. महाभारतातील या प्रमूखव्यक्तिरेखा बघितल्यानंतर विश्वनाट्यतील घनगंभीर रणकंदणाला साद घालणरी ही पात्रे खरोखरच भारावून टाकणारी आहे. एका अर्थाने ती विशिष्ट व दुसऱ्या अर्थाने ती समग्र आहे. महाभारतातील या व्यक्तिरेखा संदेशाचे वाहन आहे.

महाभारताचा महानायक हा कृष्ण आहे.कर्ण हा महाभारताचा नायक ही नाही खलनायक ही नाही तर उपनायक आह, असा जाणवतो. भीष्मापेक्षाही त्याची परिस्थिती वेगळी आहे. महाभारताच्या सर्व प्रमुख व्यक्तिरेखा मुळे महाभारताला महत्व प्राप्त झाले आहे.या व्यक्तिरेखा मुळे चौकसबुद्धीला खाद्य मिळते व वाद प्रतिवाद यातुनच सुसंवाद निर्माण होतो. महाराष्ट्रातील सांस्कृतिक पोषन होऊन प्रबोधनाच्या चळवळीला गती मिळते. कृष्ण, भीष्म, कर्ण, दूर्योधन, अर्जून, द्रोपदी इ. पात्रांना आपल्या शक्तीची पूर्णपणे जाणीव होते आणि त्यामुळे महाभारतातील ही सर्व पात्रे अलौकिक स्वरूपाची वाटतात.

**संदर्भ :**


- महादेवशास्त्री जोशीए भारतीय सांस्कृतिक कोशए १८९८, प.महादेवशास्त्री जोशी
- दुर्गाबाई भागवत व्यासपर्व१९६२, श्री पु. भागवत


Research Hub International Journal